RNI No. MAHBIL /2009/35827

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग दोन-संकीर्ण सूचना व जाहिराती

**वर्ष १०, अंक २]** **गुरुवार ते बुधवार, जानेवारी ११-१७, २०२४/पौष २१-२७, शके १९४५** **[पृष्ठे १४, किंमत : रुपये १५.००**

### प्राधिकृत प्रकाशन

**संकीर्ण सूचना व जाहिराती**

**जिल्हा परिषद, वाशिम**

क्रमांक जिपवा/साप्रवि/नियोजन/वाप्रअ २०२२-२०२३/७३३०/२०२३

**अधिसूचना**

ज्याअर्थी, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम १४२ व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (वार्षिक प्रशासन अहवाल प्रसिद्ध करणे) अधिनियम, १९६४ च्या नियम ९ अन्वये जिल्हा परिषदेने प्रसिद्ध केलेल्या अहवालाची अधिसूचना देणे आवश्यक आहे. त्याअर्थी, मी, वसुमना पंत (भा.प्र.से.), मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम सन २०२२-२०२३ चा वाशिम जिल्हा परिषदचा वार्षिक प्रशासन अहवाल दिनांक ७ डिसेंबर २०२३ रोजी मंजूर केल्याप्रमाणे प्रसिद्ध केल्याची अधिसूचना देत आहे.

वाशिम,
दिनांक २६ डिसेंबर २०२३.

**वसुमना पंत** (भा.प्र.से),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, वाशिम.

## ZILLA PARISHAD, WASHIM

*NOTIFICATION*

No. ZP/GAD/AAR 2022-2023/7330/2023

In pursuance of the provision of section 142 of Maharashtra Zilla Parishad and Panchayat Samiti Act, 1961 read with rule (Publication of Annual Administration Report) 1964, I, Vasumana Pant (I.A.S.), Chief Executive Officer, Zilla Parishad, Washim hereby notify the publication of Annual Administration Report for the year 2022-2023 as approved by the Zilla Parishad on date 7th December 2023.

VASUMANA PANT (I.A.S.),
Chief Executive Officer,
Zilla Parishad, Washim.

Washim,
Dated 26th December 2023.

## मिरा-भाईंदर महानगरपालिका

## सूचना

क्रमांक मिभा/मनपा/ नर/३१७२/२०२३-२०२४

**(महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल )**

ज्याअर्थी, मिरा-भाईंदर शहराची सुधारित विकास योजना (यापुढे जिचा उल्लेख "उक्त विकास योजना" असा करण्यात आला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे) च्या कलम ३१ (१) अन्वये शासन नगरविकास विभागाची अधिसूचना क्रमांक टीपीएस-१२९६/८४७/प्र.क्र.१६२/९६/नवि-१२, दिनांक १४ मे, १९९७ अन्वये मंजूर झाली असून, ती दिनांक १५ जुलै, १९९७ पासून अंमलात आली आहे आणि उक्त विकास योजनेच्या वगळलेल्या भागाची विकास योजना शासन नगरविकास विभागाची अधिसूचना क्र. टीपीएस-१२९८/९४१/प्र.क्र.८९/९८/नवि-१२, दिनांक २५ ऑगस्ट २००० अन्वये मंजूर झाली असून, ती, दिनांक १५ ऑक्टोबर २००० पासून अंमलात आली आहे (यापुढे ज्याचा एकत्रितपणे उल्लेख "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे.);

ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजना क्षेत्रातील मौजे घोडबंदर येथील सर्व्हे क्रमांक २०/४बी, ८पै., २१/२अे, पै., २१/२बी, पै., २२/१बी, १सी, २, ३, ५, २४/३, २५/१, २६/५,८(पै.), ९, ११०/१ पै., २पै., ११२/२पै., ११३/१,२, ११४/१,३,४,६, ११६/१,२अे(पै.),३,४,५,७,८,९, ११७/१,३, ४,५,६, ११८/२,३, ४,५,७,८, १२४/२,३, १२५/१,२,३,४,५,६,७, १२६/१ ते ६, १२७/१,२,३,४,५, १२८/५अ, ५ बपै., १३२/३, १३३/१,२,३,४,५,६,७,८, १३४/२,३,५अ, ८, १३५/३, १४८/१,२; या जमिनीतील मे. जे. पी. इन्फ्रा यांच्या मंजूर रेखांकनामध्ये नागरी "सुविधा क्षेत्र (Amenity Open Space )" क्षेत्र ३१५०.३७ चौ.मी. क्षेत्र दर्शविलेले असून सदर क्षेत्र महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेले आहे. तसेच मंजूर विकास योजनेमध्ये मौजे-घोडबंदर, स.क्र. १२७/४ पै., ५पै., १३३/१ पै., २, ३पै., ४ पै., ५पै., ६पै., ७पै., ८पै., १३४/२, १३४/३पै., १३५/३पै., १४८/१ पै., २पै., या जमिनीवर आ. क्र. ३२५ "बगीचा" (क्षेत्र ६००० चौ. मी.) हे आरक्षण असून मोजणी नकाशातील आखणीनुसार प्रत्यक्षात येणारे एकूण क्षेत्र ६०५० चौ.मी. इतके आहे. सदर आरक्षणामधील महानगरपालिकेस हस्तांतरित विकास हक्काच्या माध्यमातून १०४८.०० चौ.मी. क्षेत्र प्राप्त झाले आहे.

सदरच्या आरक्षणामधील मिरा-भाईंदर महानगरपालिकेस हस्तांतरित झालेले १०४८.०० चौ.मी. क्षेत्र व आरक्षणामधील उर्वरित ५००२.०० चौ.मी. पैकी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील समावेशक आरक्षणाच्या तरतुदीनुसार महानगरपालिकेस प्राप्त होणारे ७०% प्रमाणेचे ३५०१.४० चौ. मी. असे एकूण ४५४९.४० चौ.मी. क्षेत्र हे उपरोक्त नमूद सुविधा क्षेत्राच्या लगत एकत्रिकृत विकास नियंत्रण नियमावलीमध्ये विनियम क्र. ३.११ मधील तरतुदीनुसार स्थलांतरण करणेस महानगरपालिकेने पत्र क्र. मनपा/नर/४६१६/२०२१-२२, दिनांक ३१ मार्च २०२२ रोजी मंजुरी दिली आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका शहराची प्रारूप सुधारित विकास योजना अधिनियमाचे कलम २६ अन्वये दिनांक २८ ऑक्टोबर २०२२ रोजी प्रसिद्ध झाली असून ती कलम ३० अन्वये शासनास मंजुरीसाठी दिनांक २५ ऑक्टोबर २०२३ रोजी सादर झाली आहे. त्यामध्ये महानगरपालिकेस प्राप्त झालेले "सुविधा क्षेत्र" तसेच स्थलांतरण करण्यात आलेल्या बगीचाचे आरक्षण व इतर जमिनीवर "आ.क्र. २२६ म्युनिसिपल पर्पज " ( क्षेत्र १२४९०.०० चौ. मी.) आरक्षण प्रस्तावित करण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने सुधारित प्रारूप विकास योजना अद्याप मंजूर झाली नसल्याने मंजूर विकास योजनेमध्ये महानगरपालिकेने दिनांक ३१ मार्च २०२२ रोजी "आरक्षण क्र. ३२५ बगीचा" चे क्षेत्र स्थलांतरण करणेस दिलेल्या परवानगीनुसार सदर आरक्षण तसेच महानगरपालिकेस प्राप्त नागरी सुविधा क्षेत्र व रहिवास वापर क्षेत्रामधील स.क्र. १२७/३पै., ४पै., ५, स.क्र. १२९/५बपै. ११पै., १२पै., १३पै., स.क्र. १३०/१पै., ५पै., ६पै. स.क्र. १३१/३ पै., १३२/१ पै., २, ३, ४ पै., ५, ६पै., ८पै., ९पै., १०, ११पै., १३ पै., स.क्र. १३३/१, २, ३पै., ४, ५पै., ६, ७, ८, स.क्र. १३४/ १पै., २पै., ३पै., स.क्र. १३५/३पै., आणि स.क्र. १४८/१, २पै., ३पै., ५पै., या जागेत प्रारुप सुधारित विकास योजनेनुसार मंजूर विकास योजनेमध्ये " मनपा उद्देश" (Municipal Purpose) आरक्षण दर्शविणेबाबत मिरा-भाईंदर महानगरपालिकेने प्रशासकीय ठराव क्र. २७९, प्रकरण क्र. २७९, दिनांक ०८ डिसेंबर २०२३ अन्वये उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१) नुसार मंजूर विकास योजनेमध्ये फेरबदल प्रस्तावित करण्याचे ठरविले आहे. यापुढे "उक्त फेरबदल" असे संबोधण्यात येत आहे.

आणि त्याअर्थी, उपरोक्त नमूद "उक्त फेरबदलाबाबत" ज्या नागरीकांना हरकती किंवा सूचना द्यावयाच्या असल्यास त्यांनी हरकती / सूचना लेखी स्वरुपात सदरची अधिसूचना **शासन राजपत्रात** प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या मुदतीपर्यंत सादर कराव्यात, म्हणजे सदर फेरबदलाच्या प्रस्तावास अंतिम स्वरुप देण्यापूर्वी उक्त सूचना / हरकतींचा विचार करता येऊ शकेल.

प्रस्तावित फेरबदल दर्शविणारा नकाशा जनतेच्या अवलोकनासाठी व माहितीसाठी, महानगरपालिका, मुख्य कार्यालयात व नगररचना विभागामध्ये कार्यालयीन वेळेत ठेवण्यात आला आहे.

मिरा-भाईंदर,
दिनांक २९ डिसेंबर २०२३.

**संजय काटकर** (भा.प्र.से),
आयुक्त तथा प्रशासक,
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

**MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION**

**Notice**

No. MB/MC/TP/3172/2023-2024

**(Amendment under section 37 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.)**

Whereas, the Revised Development Plan of the city of Mira-Bhayander (hereinafter referred to as "the said Development Plan") has been sanctioned by the Government in Urban Development Department, under section 31(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") *vide* Notification No.TPS-1296/847/CR-162/96/UD-12, dated the 14th May, 1997 (hereinafter referred to as "the said Notification") and has come into force *with effect from* 15th July, 1997 and the Excluded Part of the said Development plan has been sanctioned by the Government in Urban Development Department *vide* Notification No. TPS-1298/941/CR-89/98/UD-12, dated the 25th August, 2000 which came into force *with effect from* the 15th October, 2000;

And Whereas in the said Development Plan, The Layout of M/s. J.P. Infra Approved by Municipal Corporation in the land bearing Survey No.20/4B, 8Pt., 21/2A,Pt., 21/2B,Pt., 22/1B, 1C,2,3,5,24/3, 25/1, 26/5,8(Pt.),9, 110/1Pt., 2Pt., 112/2Pt., 113/1,2, 114/1,3,4,6, 116/1,2A(Pt.),3,4,5,7,8,9, 117/1,3, 4,5,6, 118/2,3, 4,5,7,8, 124/2,3, 125/1,2,3,4,5,6,7, 126/1 to 6, 127/1,2,3,4,5, 128/5a, 5bPt., 132/3, 133/1,2,3,4, 5, 6,7,8; 134/2,3,5a,8, 135/3, 148/1,2; at Village Ghodbunder the urban "Amenity Open Space" area admeasuring 3150.37 sq.m. has been handed over to the Municipal Corporation and the land bearing at, S.No.127/4Pt., 5Pt., 133/1Pt., 2, 3Pt., 4Pt., 5Pt., 6Pt., 7Pt., 8Pt., 134/2, 134/3Pt., 135/3Pt., 148/1Pt., 2 Pt., of village Ghodbundar in the said development plan has been a reserved for Reservation No. 325 "Garden" (area 6000 sq.m.) as per the actual measurement plan reservation area is 6050 sq.m. out of the area of the said reservation 1048.00 sq. mtr. handed over to Municipal Corporation in the form of Transferable Development Rights.

Area 1048.00 sq.m., which was Transferred ot Mira-Bhaindar Municipal Corporation in the said reservation and remaining 5002.00 sq.m. out of 70% Area 3501.40 sq.mtr. in the Garden reservation as per the provision of Accommodation reservation Principle in the Unified Development Control and Promotion Regulations. Such total area of 4549.40 sq.mtr. area relocate adjacent to the amenity area as per the provision of 3.11 of the Unified Development Control and Promotion Regulations has approved Letter No.MBMC/TP/4616/2021-22, dated 31st March 2022.

The draft revised development plan of Mira-Bhaindar Municipal Corporation has been published under section 26 of the said act dated 28th October 2022 and the draft revised Development Plan has been submitted to the Government for approval under section 30 of the said act dated 25th October 2023. In the draft development plan "Amenity Area" received by the Municipal Corporation as well as the reservation of the garden which was shifted under Resolution No. 3.11 and other remaining land reserved for the purpose of "Reservation No. 226 "Municipal Purpose" (area 12490.00 sq.m.).

Accordingly, as per the revised draft development plan has not been sanctioned, according to the sanctiond development plan permission given by the Municipal Corporation on 31st March 2022 to relocate the area of "Reservation No. 325 Garden", in the said sanctioned Development Plan as well as the "Amenity Open Space" Area received by Municipal Corporation and the land under residential zone in the Sr.No.127/3Pt., 4Pt., 5, S.No. 129/5Pt. 11Pt., 12Pt.,13pt., S.No.130/1Pt., 5Pt., 6Pt. S.No. 131/3Pt., 132/1Pt.,2,3,4Pt.,5, 6Pt.,8Pt.,9Pt.,10,11Pt., 13Pt., S.No.133/1,2, 3Pt, 4Pt., 5Pt., 6Pt., 7Pt., 8Pt., S.No. 134/1Pt., 2Pt., 3Pt., S.No. 135/3Pt., and S.No.148/1,2Pt., 3Pt., 5Pt., the Municipal Corporation Administrative Resolution No. 279, case No. 279, dated 8th December 2023, it is reserved for the purpose of "Municipal Purpose" area admeasuring about 12490.00 sq. mtr. As per the draft development plan submitted to Government decided to propose modification in the

approved development plan as per Section 37(1) of the said Act. (hereinafter referred to as "the said modification".)

And in that regard, the citizens who have to give objections or suggestions regarding the above-mentioned "said modification" should submit their objections/suggestions in written form within 30 days from the date of publication of the said notification in the *Government Gazette,* that is, the said suggestions/objections may be considered before finalizing the said modification proposal.

A map showing the proposed modification has been placed for public inspection and information at the Municipal Corporation, Head Office and Town Planning Department during office hours.

Mira-Bhaindar,
Dated 29th December 2023.

SANJAY KATKAR (I.A.S),
Commissioner and Administrator,
Mira-Bhaindar Municipal Corporation.

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## अधिसूचना

क्र.प्र.अ/(वि. नि)१९१३९/पु. उप

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे " उक्त अधिनियम" असा उल्लेख करणेत आलेला आहे) चे कलम ३१, पोट-कलम (१) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून राज्य शासनाने अधिसूचना क्र. टिपीबी ४३१७ /६२९/ प्र.क्र.११८/२०१७/वि.यो./नवि-११, दिनांक ८ मे २०१८ (यापुढे "उक्त अधिसूचना" असा उल्लेख करणेत आलेला आहे) द्वारे बृहन्मुंबई प्रारूप विकास योजना - २०३४ (यापुढे " उक्त विकास योजना” असा उल्लेख करणेत आलेला आहे) सह विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली - २०३४ ला मंजुरी दिली आहे ;

ज्याअर्थी, एन विभागाच्या मंजूर विकास आराखडा २०३४ नुसार न. भू. क्र. ५०, मौजे विक्रोळी हा भूखंड इओएस २. ६ (मनोरंजन मैदान) (मोठ्या विद्यमान सुविधांचा भाग) आणि इटी १.६ (सार्वजनिक वाहनतळ) या विद्यमान सुविधांनी बाधित आहे. तसेच सदर भूखंड १५.२५ मी. रुंद विकास नियोजन रस्त्याने बाधित असून निवास क्षेत्र (आर) मध्ये स्थित आहे व न.भू.क्र. १९४ए/७ मौजे घाटकोपर हा भूखंड आरओएस १.५ (उद्यान/बगीचा), आरएच १.२ (रुग्णालय), आरइ १.२ (प्राथमिक/ माध्यमिक शाळा), आरओएस १.४ (खेळाचे मैदान) या आरक्षणाने तसेच इआर १.२ (पोलीस निवासी संकुल ) व इओएस १.४ (खेळाचे मैदान) या अस्तित्वातील सुविधानी बाधित आहे. सदर भूखंड १२.२० मी. रुंदी (२), २४ मी., १८.३० मी. रुंद (२) आणि ९.१५ मी. रुंद प्रस्तावित विकास नियोजन रस्त्याने बाधित असून १८.३० मी. रुंदीकरणाने बाधित आहे. सदर भूखंड निवासी क्षेत्रात स्थित आहे ;

ज्याअर्थी, विकास आराखडा २०३४ मंजूर करताना न.भू.क्र. १९४ए/७ मौजे घाटकोपर या भूखंडावरील आरक्षणे/नामनिर्देशने वगळलेल्या भागामध्ये अंतर्भूत होती ज्यास शासनाने क्र. टिपीबी/४३२०/सीआर-१३५/२०२०/नवि-११, दिनांक १२ सप्टेंबर २०२२ अन्वये मंजुरी दिलेली असून त्या वरून असे दिसून येते की, न. भू. क्र. १९४अ/७ मौजे घाटकोपर हा आरएच १.३ + (प्रसूती गृह आणि महापालिका गृहनिर्माण) या आरक्षणाने बाधित आहे व लगतचा भूखंड न.भू.क्र. क्रमांक १९३ब चा भाग देखील आरएच १.३ + (प्रसूती गृह आणि महापालिका गृहनिर्माण) या आरक्षणाने बाधित आहे. त्याचप्रमाणे मंजूर विकास आराखडा २०३४ नुसार अ.भु. क्र. ४६, नगररचना योजना घाटकोपर-II हा भूखंड आरएच १.२ (रुग्णालय) व अंशता आरटी १.४ (बेस्ट बस सुविधा) च्या आरक्षणाने बाधित आहे. सदर भूखंड प्रस्तावित ९.१५ मी. रुंदीकरणाने बाधित आहे. सदर भूखंड निवासी क्षेत्रात स्थित आहे ;

ज्याअर्थी, एन विभागाच्या मंजूर विकास आराखडा २०३४ मध्ये मौजे न.भू.क्र. १९४ अ/७(भाग) आणि न. भू.क्र.१९३ब (भाग) मौजे घाटकोपर या भूखंडावरील अंदाजे ५३०० चौ. मी. इतके क्षेत्रफळ असणारे भूखंडावरील आरएच १.३ + (प्रसूती गृह आणि महापालिका गृहनिर्माण) चे आरक्षण व अ.भु. क्र. ४६ (भाग), नगररचना योजना घाटकोपर-II या भूखंडावरील अंदाजे ३५०० चौ. मी. इतके क्षेत्रफळ असणारे आरएच १.२ (रुग्णालये) चे आरक्षण रद्द करून त्या भूखंडावर आरओएस १.५ (बगीचा/ उद्यान) चे आरक्षण प्रस्तावित करण्यात येत आहे व न. भू.क्र. ५०बी मौजे विक्रोळी या भूखंडावरील इओएस २.६ (मनोरंजन मैदान) ची विद्यमान सुविधा रद्द करून त्या ऐवजी सदर भूखंडावर ४२९३.५० चौ.मी. क्षेत्रफळाकरिता आरएसए ४.८ (स्मशानभूमी) व ४३०० चौ.मी. क्षेत्रफळाकरिता आरएच १.२ (रुग्णालय) हे आरक्षण नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे दर्शविण्याचे प्रस्तावित आहे ;

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ च्या पोट-कलम (१) आणि (२) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून नियोजन प्राधिकरण, किंवा राज्य सरकारने असे निर्देश दिल्यावर, अशा निर्देशांच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत, कोणत्याही व्यक्तीकडून सूचना/आक्षेप मागवण्याकरिता नोटीस प्रकाशित केली जाईल आणि सुनावणी दिल्यानंतर, प्रस्तावित बदल राज्य सरकारला सादर करण्यात येईल. सदर बदल मंजूर करणे किंवा मंजुरी देण्यास नकार देणे हे राज्य सरकारच्या अधीन राहील ;

ज्याअर्थी, महानगरपालिकेचे परिपत्रक क्र. बीएमसी/एडीएमएन/३, दिनांक ७ एप्रिल २०२२ नुसार अद्यावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ६क (१) अन्वये महानगरपालिका आणि महानगरपालिकेच्या इतर प्राधिकरणांचे सर्व अधिकार आता प्रशासकांकडे निहित आहेत ;

ज्याअर्थी, प्रशासक ( सुधार समिती) यांनी ठराव क्र ५२, दिनांक १४ डिसेंबर २०२३ अन्वये व उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रशासक (महानगरपालिका) यांचा ठराव क्र. ९५८, दिनांक २१ डिसेंबर २०२३ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम,

१९६६ कलम ३७ (१) मधील तरतुदीनुसार मंजूर विकास आराखडा-२०३४ मध्ये फेरबदल करण्याच्या प्रस्तावाची कार्यवाही सुरू करणे, विहित कालावधीमध्ये सूचना/हरकती मागविणे व प्राप्त सूचना/हरकतींवर सुनावणी घेणे आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ (२) नुसार फेरबदल प्रस्तावास महाराष्ट्र शासनाची अंतिम मंजुरी घेणेकरिता नगरविकास विभाग खात्याशी पत्रव्यवहार करण्याची मंजुरी दिली आहे.

आणि त्याअर्थी, उपरोक्त परिस्थिती आणि वस्तुस्थिती विचारात घेता आणि उक्त अधिनियमाच्या कलम ३७ (१) अन्वये प्राप्त अधिकार आणि त्या संदर्भातील सर्व अधिकारांचा वापर करून, बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे प्रस्तावित फेरबदलाविषयी उक्त अधिनियमाच्या कलम ३७ (१) नुसार कोणत्याही व्यक्तीकडून हरकती/सूचना मागविण्यासाठी तसेच संभाव्य बाधित होणाऱ्या व्यक्तींच्या माहितीसाठी सदर सूचना प्रसिद्ध करीत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून असेही कळविण्यात येत आहे की, वरील प्रस्तावित फेरबदलाविषयी कोणत्याही हरकती / सूचना, सदर सूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत लेखी स्वरूपात प्रमुख अभियंता (विकास नियोजन), बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे महानगरपालिका मुख्यालय, ५ वा मजला, विस्तारित इमारत, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१ या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठविण्यात याव्यात. सदरच्या कालावधीत प्राप्त होणाऱ्या हरकती / सूचना यावर उक्त अधिनियमाच्या कलम ३७ (१) अन्वये कार्यवाही करण्यात येईल. त्यानंतर प्राप्त झालेल्या सूचना / हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

प्रस्तावित फेरबदल दर्शविणारा नकाशा जनतेच्या अवलोकनासाठी खालील कार्यालयात उपलब्ध करण्यात आला आहे. :

(१) प्रमुख अभियंता ( विकास नियोजन), बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे कार्यालय, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.

(२) सहाय्यक आयुक्त, एन विभाग, २रा मजला, जवाहर रोड, घाटकोपर (पूर्व), मुंबई ४०० ०७७.

(३) उप संचालक, नगररचना, बृहन्मुंबई यांचे कार्यालय, इन्साहटमेंट, ई-ब्लॉक, आझाद मैदान, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.

दिनांक ४ जानेवारी २०२४,
PRO/ 2466/ADV/2023-24.

**सुनिल हि. राठोड,**
प्रमुख अभियंता (विकास नियोजन).

**BRIHANMUMBAI MUNICIPAL CORPORATION**

*NOTIFICATION*

No. CHE/DP/19139/ES

Whereas, as per the powers conferred by sub section (*1*) of Section 31 of the MR & TP Act, 1966, State Government has accorded sanction to the Draft Development Plan-2034 of Greater Mumbai (hereinafter referred to as "the said Development Plan") *vide* Notification No. TPB-4317/629/CR-118/2017/DP/UD-11, dated 8th May 2018 (hereinafter referred to as ("the said Notification") alongwith the Development Control and Promotion Regulations 2034 for Greater Mumbai ;

And whereas, the land bearing C.T.S. No. 50 of village Vikhroli is affected by existing amenities of EOS 2.6 (Recreation Ground)( part of larger existing amenities) and ET 1.6 (Public Parking Lot). The land is affected by 15.25 mtr wide proposed D.P. Road and is situated in Residential Zone (R) and the land bearing C.T.S. No. 194A/7 of village Ghatkopar is affected by the reservation of ROS 1.5 (Garden/Park), RH1.2(Hospital) (part of larger reservation), RE 1.1 (Municipal School), RE 1.2 (Primary/Secondary School), ROS 1.4 (Play Ground) (Part of larger reservation) and existing amenity of RE 1.2 (Police Staff Quarters) and EOS 1.4 (Play Ground). The land is affected by 12.2mtr (2 nos), 24 mtr, 18.30 mtr (2 nos) and 9.15 mtr wide DP Roads and road widening of 18.30 mtr. The same is situated in Residential Zone ;

And whereas, while sanctioning DP 2034, *vide* Notification U/No.TPB-4320/CR- 135/2020/UD-11, dated 8th May 2018, the reservations/designations on land bearing CTS No. 194A/7 of village Ghatkopar were in EP-N59, EP N44. From Sanctioned EP-N59 it can be seen that, the land under reference *i.e* CTS No. 194A/7 (pt) is affected by the reservation of R.H. 1.3+(Maternity Home and Municipal Housing) and some part of CTS No. 193B of village Ghatkopar is also affected with reservation of R.H. 1.3+(Maternity Home and Municipal Housing). Also, the land bearing F.P. No. 46, T.P.S.-II Ghatkopar is partly affected by the reservation of R.H. 1.2 (Hospital) and partly affected by the reservation of RT 1.4 (Best Bus Facilities). The land is affected by proposed road widening of 9.15 mtr and the land is situated in Residential Zone;

And whereas, it is proposed to delete the existing amenity of EOS 2.6 (Recreation Ground) on land bearing C.T.S. No. 50B of village Vikhroli and to propose reservation of RSA 4.8 (Cemetery) on part land admeasuring aprox. 4293.5 sq.mtr. and RH 1.2 (Hospital) on remaining part of land admeasuring aprox. 4300 sq.mtr. and to delete the reservation of RH 1.3+ (Maternity Home and Municipal Housing) on land bearing C.T.S. No. 194A/7(pt) and CTS. No. 193B(pt) of village Ghatkopar having ownership in the name of Maharashtra State Police Housing and Welfare Corporation as per online PRC admeasuring aprox 5300 sq.mtr. and reservation of R.H. 1.2 (Hospital) on F.P. No. 46(pt), T.P.S.-II Ghatkopar village Ghatkopar Kirol, having ownership in the name of Government of India as per Form B, admeasuring aprox. 3500 Sq.mtr. and to propose the reservation of ROS 1.5 (Garden/Park) on said land ;

Whereas, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) and (*2*) of Section 37 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "MR & TP Act, 1966"), the Planning Authority may, or when so directed by the State Government shall within one month from date of such directions publish a notice inviting suggestions/ objections from any person, as mentioned therein and after giving hearing, submit the proposed modification to the State Government and the State Government subject to such condition as it may deem fit sanction the modification or refuse to accord sanction ;

And whereas, as per circular U/No. BMC/ADMN/3 dated 7th April 2022, under section 6C (1) of Mumbai Municipal Corporation Act, 1888 (hereinafter referred as 'MMC Act, 1888') all the powers of the Corporation are now vested with the Administrator;

And whereas, Administrator (Improvement Committee) *vide* Resolution No 52 of dated 14th December 2023 and Administrator (Corporation) *vide* Resolution No. 958 dated 21st December 2023 has accorded sanction to initiate the modification proposal, to invite suggestions/objections from

general public under section 37(1) of MR & TP Act, 1966 and to make correspondence with State Govt. in Urban Development Dept. for final sanction under section 37(2) of MR & TP Act, 1966 for the proposed modification in Sanctioned DP 2034.

Now, therefore, after considering the above facts and circumstances and in exercise of the powers conferred by sub section (*1*) of Section 37 of the MR & TP Act, 1966 ; and of all other powers enabling it in this behalf, Brihanmumbai Municipal Corporation (hereinafter referred as BMC) hereby publishes a Notice for inviting objections/ suggestions from any persons with respect to proposed modification, as required by Section 37(1) of the said Act, for information of all persons likely to be affected thereby. BMC is further pleased to inform that any objections/ suggestions in respect of the proposed modification mentioned above may be forwarded, in writing before the expiry of 30 days from the date of publication of this notification, to the office of

Chief Engineer (Development Plan)

Brihanmumbai Municipal Corporation,

5th Floor, Municipal Head Office,

Mahapalika Marg, Fort, Mumbai 400 001.

Any objections or suggestions, which may be received within the said period will be dealt with in accordance with the provisions of Section 37(1) of the said Act by the Chief Engineer (Development Plan) BMC. The Suggestions/Objections received after expiry period of one month will not be considered.

A part plan showing the proposed modification is kept open for the inspection of the general public at the following offices :

(1) Office of the Chief Engineer (Development Plan), 5th Floor, Brihanmumbai Municipal Corporation, Mahapalika Marg, Mumbai 400 001.

(2) Office of A. C. N Ward, 2nd Floor, Javahar Road, Ghatkopar (E.), Mumbai 400 077.

(3) Office of the Deputy Director of Town Planning, Greater Mumbai, having his office at ENSA Hutments, E-Block, Azad Maidan, Mahapalika Marg, Mumbai 400 001.

dated 4th January 2024,
PRO/2466 /ADV/2023-24.

S. H. RATHOD,
Chief Engineer,
(Development Plan).

## महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

प्रस्तावित योजनांची अधिसूचना

No. MSETCL/CO/PS/Scheme-I/RE/PN/00040

विद्युत कायदा २००३ च्या कलम १६४ प्रमाणे व महाराष्ट्र शासनाच्या आदेश क्रमांक ०६/ प्र.क्र.३१२/उर्जा/४, दिनांक २४.०८.२००६ (शासकीय राजपत्र पान क्रमांक २८०) नुसार, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीस प्रदान केलेल्या अधिकारानुसार, खाली नमूद केल्याप्रमाणे अति उच्च दाब पारेषण योजनेचे काम महापारेषण कंपनीच्या देखरेखीखाली करण्याचे प्रस्तावित करीत आहे. जनतेच्या माहितीकरिता ही अधिसूचना देण्यात येत आहे.

२. खालील योजना नूतनशील ऊर्जेचे निष्कासन करण्यासाठी आहे.

(१) बीड जिल्ह्यातील वाघीरा व परिसर येथे मे. श्री मारुती विण्ड पार्क डेव्हलपर्स यांच्या १०० मे.वॅ. पवन ऊर्जा प्रकल्पातील विजेचे निष्कासन करणेबाबत. (i) २२० के. व्ही. पाटोदा उपकेंद्र ते २२० के. व्ही. विण्ड फार्म उपकेंद्रापर्यंत २२० के. व्ही. एकेरी परिपथ वाहिनी दुहेरी मनोऱ्यावर ओ. पी. जी. डब्ल्यू. सह उभारणे - ८ कि.मी. सदर वाहिनीचा मार्ग कसबेपाटोदा, तांबाराजूरी, चुंबळी, ता. पाटोदा, जि. बीड येथील महसूली गावाच्या परिक्षेत्रातून प्रस्तावित आहे. (ii) २२० के. व्ही. पाटोदा उपकेंद्रामध्ये २२० के. व्ही. वाहिनी बे - १ नं. (iii) २२० के. व्ही. विण्ड फार्म उपकेंद्रामध्ये वाहिनी बे उभारणे - १ नं. (iv) पी. एल. सी. सी. व फोटे उपकरणे (v) २२० के. व्ही. पाटोदा उपकेंद्रामध्ये अस्तित्वात असलेल्या स्काडा प्रणालीमध्ये बे इंटीग्रेट करणे. (vi) ए. बी. टी. मीटर व इतर संलग्न उपकरणे उभारणे. (vii) २२० के. व्ही. पाटोदा उपकेंद्रामध्ये मीटरींग सीटी व पीटी (मेन व चेक) उभारणे. (viii) स्थापत्य कामे : गॅंट्री पायाभरणीचे बांधकाम आणि उपकरणाची पायाभरणी, बे कंट्रोल रुम. या योजनेचा अंदाजे खर्च रु. १२५५.११ लाख इतका आहे.

(२) धाराशीव जिल्ह्यातील अलियाबाद, ता. तुळजापूर येथे मे. श्री मारुती विण्ड पार्क डेव्हलपर्स यांच्या १०० मे.वॅ. हायब्रीड (सौर ऊर्जा व पवन ऊर्जा) प्रकल्पातील विजेचे निष्कासन करणेबाबत. (i) २२० / १३२ के. व्ही. नारंगवाडी उपकेंद्र ते १३२ के. व्ही. संयुक्त उपकेंद्रापर्यंत १३२ के. व्ही. एकेरी परिपथ वाहिनी दुहेरी मनोऱ्यावर ओ. पी. जी. डब्ल्यू. सह उभारणे - ७.७८२ कि.मी. सदर वाहिनीचा मार्ग होळी, ता. लोहारा, आणि पेठसावंगी, नारंगवाडी, ता. उमरगा, जि. धाराशीव येथील महसूली गावाच्या परिक्षेत्रातून प्रस्तावित आहे. (ii) २२०/१३२ के. व्ही. नारंगवाडी उपकेंद्रामध्ये १३२ के. व्ही. वाहिनी बे – १ नं. (iii) १३२ के. व्ही. संयुक्त उपकेंद्रामध्ये वाहिनी बे उभारणे १ नं. (iv) पी. एल. सी.सी. व फोटे उपकरणे (v) २२०/१३२ के. व्ही. नारंगवाडी उपकेंद्रामध्ये अस्तित्वात असलेल्या बस बार प्रोटेक्शनमध्ये बे इंटीग्रेट करणे. (vi) २२०/१३२ के. व्ही. नारंगवाडी उपकेंद्रामध्ये अस्तित्वात असलेल्या स्काडा प्रणालीमध्ये बे इंटीग्रेट करणे. (vii) ए. बी. टी. मीटर व इतर संलग्न उपकरणे उभारणे. (viii) २२०/१३२ के. व्ही. नारंगवाडी उपकेंद्रामध्ये मीटरींग सीटी व पीटी (मेन व चेक) उभारणे. (ix) स्थापत्य कामे : गॅंट्री पायाभरणीचे बांधकाम आणि उपकरणाची पायाभरणी, मीटरिंग रुम. या योजनेचा अंदाजे खर्च रु. ७२८.८३ लाख इतका आहे.

३. परवानेधारक अगर हितसंबंध असलेल्या व्यक्तीने हवे असल्यास, ही सूचना प्रसिध्द केलेल्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितच्या विचाराकरिता पारेषण कंपनीस प्रतिवेदने पाठवावीत, अशी त्यांना अधिसूचना देण्यात येत आहे. याबाबतची अधिक माहिती मुख्य अभियंता (प्रकल्प योजना), महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित, ३ रा मजला, प्रकाशगंगा, प्लॉट नं. सी-१९, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१ यांचेशी वेळीच संपर्क साधून मिळू शकते.

(सही)/-
संचालक (प्रकल्प)(प्रभारी),
महापारेषण, मुंबई.

मुंबई,
दिनांक : २८ डिसेंबर २०२३.

**Serial No. M-2331**

## NOTICE

Notice is hereby given that the certificate (s) for LARSEN AND TOUBRO LIMITED Equity share Nos. 675

| Folio No. | No. of Shares | Certificates Nos. | Distinctive Nos. | |
|---|---|---|---|---|
| | | | FROM | TO |
| 09712623 | 75 | 91605 | 444401 | 444475 |
| | 75 | 246997 | 142945301 | 142945375 |
| | 150 | 365074 | 578496878 | 578497027 |
| | 150 | 458432 | 619822820 | 619822969 |
| | 225 | 1323362 | 1391083176 | 1391083400 |

Of Larsen And Toubro Limited standing in the name of PARVATI SINGH BAIS have been lost or mislaid and the undersigned have applied to the company to issue duplicate certificate (s) for the said shares.Any person who has any claim in respect of the said shares should write to our registrar, KFin Technologies Limited. Selenium Tower B, Plot 31-32, Gachibowli, Financial District Hyderabad 50032 within one month from this date else the company will proceed to issue duplicate Certificate(s)

Date : 6th January 2024.

PARVATI SINGH BAIS,
Name of shareholder(s),
Dx -57, Sector 56, KENDRIYA VIHAR GURGAON,
HARYANA, PIN CODE 122 011.

**Serial No. M-2332**

**TATA TECHNOLOGIES LTD**

*Reg office* : Plot No 25, Rajiv Gandhi lnfotech Park, Hinjewadi, Pune, 411057

NOTICE is hereby given that the certificates for the undermentioned securities of the company has been lost and the holder of the said securities has applied to the Company to issue duplicate certificates.

Any person who has a claim in respect f the said securities should lodge such claim with the Company at its registered office within 15 days from this date, else the Company will proceed to issue duplicate certificates without further intimation.

| Name of the Shareholders | Kind of Securities and Face Value | Certificate Nos | Distinctive Number(s) |
|---|---|---|---|
| P. Sridhar Reddy | Equity and 2/- | 2000 | 2489781 to 2490780 & 205324046 to 205325045 |

Place : Hyderabad,
Date : 30th December 2023.

P. SRIDHAR REDDY.

| **BRIHANMUMBAI MAHANAGARPALIKA** | |
|---|---|
| **Tender No. 2024_MCGM_979799_1** | |
| **Department** | **Office of the Asstt. Commissioner K/W, Andheri (W), Mumbai - 400058.** |
| **Section** | **Asstt. Eng. (Maint.) K/W** |
| **Subject** | |
| Brihanmumbai Mahanagarpalika K/West Ward has invited tender for Ancient Heritage Look Sculpture with Centre portion of fountain made in circular shape with 2 steps for water effect at Lokhandwala Circle in Versova Assembly Constituency no. 164, in K/West Ward. | |
| Cost of E- Tender(Estimated Cost) | Rs.24,95,580.00 |
| Bid Security Deposit / EMD | Rs.49,912. |
| Date of issue and sale of tender | 11.01.2024 from 11:00 Hrs |
| Last date & time for sale of tender | 18.01.2024 upto 16:00 Hrs |
| Opening of Packet- A (Online) | 19.01.2024 from 16:00 Hrs |
| Opening of Packet- B(Online) | 19.01.2024 from 16:00 Hrs |
| Opening of Packet- C(Online) | 22.01.2024 from 15:00 Hrs |
| Website | http://mahatenders.gov.in |
| Contact Person : | |
| a) Name:<br><br>b) Office No.<br>c) E Mail Id | Shri Yashpal Hangargekar, Asstt. Engineer (Maint.) K/W<br>(022) 26239190 / (022) 26239202<br>ae02maint.kw@mcgm.gov.i |

PRO/2504/ADV/2023-24.

DR. PRITHVIRAJ C. CHAUHAN,
Asstt. Commissioner K/W.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.